महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ५० वे | दिनांक : १०/०२/२०२६ | वार : मंगळवार

# मणिपूर मध्ये पुन्हा हिंसाचार, 25 घरे जाळली



**इम्फाळ :** मणिपूरमधील उखरुल जिल्ह्यातील व्यावसायिक शहर लितानमध्ये तणाव कायम आहे. तरीही, मोठ्या प्रमाणात सुरक्षा दलांच्या तैनातीमुळे सध्या परिस्थिती शांत आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तांगखुल नागा आणि कुकी समुदायांमधील हिंसक संघर्षांनंतर लितान आणि त्याला लागून असलेल्या मंगकोट गावातून मोठ्या प्रमाणावर लोकांचे स्थलांतर सुरू आहे.

रविवारी रात्री उशिरा सुमारे ११:३० वाजता लितान बाजारात हिंसाचार उसळला होता. यावेळी उपद्रवींनी स्वयंचलित शस्त्रे आणि रायफल्सने गोळीबारही केला, ज्यामुळे परिसरात दहशत पसरली. या हिंसाचारात २५ घरे आणि चार सरकारी निवासस्थाने जळून खाक झाली आहेत.

या हिंसाचाराची सुरुवात ७ फेब्रुवारीच्या संध्याकाळी लितान सरेइखोंग येथे दारूच्या नशेत झालेल्या भांडणातून झाली, ज्यात तांगखुल समुदायाच्या स्टर्लिंग नावाच्या व्यक्तीला मारहाण झाल्याचे म्हटले जाते. नंतर त्याला उपचारासाठी इम्फाळ येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. उखरुलच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी लितानमध्ये कर्फ्यू लागू केला आहे. तणाव वाढण्याच्या शक्यतेमुळे लोकांनी कोणत्याही संघटित पोलिस स्थलांतराशिवाय आपल्या पातळीवरच घरे सोडण्यास सुरुवात केली होती. अधिकाऱ्यांनी सांगितले की, लितान पोलिस ठाण्यातील पोलिसांनी लोकांची सुरक्षित ये-जा सुनिश्चित केली आणि कायदा व सुव्यवस्था राखली. बाधित क्षेत्रांमध्ये बीएसएफ, सीआरपीएफ आणि आसाम रायफल्सचे जवान तैनात करण्यात आले आहेत, तर अतिरिक्त सुरक्षा दलही पाठवण्यात आले आहे.

इम्फाळपासून सुमारे ३५ किलोमीटर अंतरावर असलेले लितान हे एक छोटे व्यावसायिक शहर आहे, जिथे तांगखुल नागा आणि कुकी दोन्ही समुदाय राहतात आणि ते आसपासच्या गावांसाठी व्यापारी केंद्र म्हणून काम करते. मिश्र लोकसंख्या बाजारपेठा व निवासी क्षेत्रांच्या जवळ असल्यामुळे परिस्थिती राहिली आहे. पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणी एफआयआर (FIR) दाखल करण्यातआहे आणि पुढील तपास सुरू आहे. सुरक्षा दल तैनात आहेत आणि प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे.

मणिपूरचे उपमुख्यमंत्री लोसी डिखो, जे एक नागा नेते ल आहेत, रविवारपासूनच अशांत भागात तळ ठोकून आहेत आणि तणाव कमी करण्यासाठी स्थानिक लोकांशी बैठका घेत आहेत. लोसी डिखो यांनी वरिष्ठ भाजप नेते एल न्यूमई यांच्या उपस्थितीत त्यांच्या लॅम्फेल येथील घरी फुटहिल्स नागा कोऑर्डिनेटिंग कमिटी (FNCC) आणि जॉइंट ट्राइब्स काउंसिल (JTC) च्या नेत्यांसोबत बैठकही घेतली.

भाजप नेते युमनाम खेमचंद सिंह मणिपूरचे १३ वे मुख्यमंत्री बनले. राज्यपाल अजय कुमार भल्ला यांनी बुधवारी संध्याकाळी इम्फाळ येथील लोकभवनात खेमचंद यांना शपथ दिली. खेमचंद मैतेई समुदायाचे आहेत. त्यांच्यासोबतच नागा समुदायातून आलेले लोसी दिखो यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. ते नागा पीपल्स फ्रंटचे आमदार आहेत. तर, कुकी समुदायातून आलेल्या नेम्चा किप्गेन राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री बनल्या. भाजप नेत्या नेम्चा यांनी दिल्लीतील मणिपूर भवनातून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शपथ घेतली.

# आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी पाटीलचा भीषण अपघातात मृत्यू





**मुंबई :** पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पालघर जिल्ह्यातील मनोरजवळ झालेल्या भीषण अपघातात आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी शिवाजी पाटील (वय २७) यांचा जागीच मृत्यू झाला. मनोरजवळील दुर्वेश गावाच्या हद्दीत त्यांची भरधाव फॉर्च्युनर कार एका अवजड वाहनावर पाठीमागून आदळल्याने हा अपघात झाला. ही धडक इतकी भीषण होती की कारचा पुढचा भाग अक्षरशः चेंदामेंदा झाला. या दुर्घटनेत संभाजी पाटील यांनी प्राण गमावले असून, त्यांचा सहकारी यश प्रशांत चौधरी (वय २२) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील पालघर येथील दुर्वेश गावाच्या हद्दीत झालेल्या भीषण अपघातात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नेमबाज संभाजी पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. सकाळी १० वाजेच्या सुमारास त्यांचा मित्र प्रणय प्रशांत चौधरी याने आपली भरधाव कार दुसऱ्या मार्गिकेतून पहिल्या मार्गिकेत घेताना समोरच्या 'हायवा' ट्रकचा अंदाज न आल्याने ही जोरदार धडक बसली. या दुर्घटनेत संभाजी पाटील यांनी प्राण गमावले असून, कार चालक प्रणय चौधरी हा गंभीर जखमी झाला आहे.

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग आणि मनोर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली, मात्र रुग्णालयात नेले असता आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी पाटील यांना मृत घोषित करण्यात आले, तर जखमी प्रणय यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. बालेवाडी क्रीडा संकुलात क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या पाटील यांच्या पार्थिवाचे शवविच्छेदन करून ते नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. मनोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या पार्थिवावर छत्रपती संभाजीनगर येथील त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील पालघर जिल्ह्यातील मनोरजवळ झालेल्या एका भीषण अपघातात आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू संभाजी पाटील यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने क्रीडा विश्वातून मोठी हळहळ व्यक्त होत आहे. पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना दुर्वेश गावाच्या हद्दीत त्यांची भरधाव फॉर्च्युनर कार एका अवजड वाहनावर पाठीमागून जोराने धडकली. ही धडक इतकी भीषण होती की कारचे बोनेट आणि इंजिनचा भाग अक्षरशः चिरडला जाऊन पूर्णपणे नष्ट झाला असून, अपघातस्थळी केवळ कारचा मागील भाग आणि चाकेच शिल्लक उरल्याचे विदारक दृश्य पाहायला मिळाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० फेब्रुवारी २०२६


## दौलताबाद जिल्हा परिषद गटात कमळ फुलले; भाजपचा विजय





**दौलताबाद जावेद अहेमद :** पक्षाच्या लंकाबाई राणोजी जाधव तर दौलताबाद पंचायत समिती गणातून भारतीय जनता पक्षाचे सर्जेराव विश्वनाथ चव्हाण तिसगाव गणातून शिवसेना पक्षाच्या सुनंदा स्वप्निल अडसुळे विजयी झाले. सोमवारी झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीची मतमोजणी झाली असून जिल्हा परिषद गटातून भारतीय जनता पार्टी कडून लंकाबाई रानुबा जाधव तर एमआयएम कडून प्रतिभा कृष्णा साबळे या दोघात सरळ लढत होऊन लंकाबाई रानुबा जाधव यांनी ६७२१ मतांनी बाजी मारली त्यांना १२८२८ मते मिळाली तर प्रतिभा कृष्णा साबळे यांना ६१०७ मते मिळाली दौलताबाद पंचायत समिती गणातून भारतीय जनता पक्षाचे सर्जेराव विश्वनात चव्हाण हे १८४३ मतांनी विजयी झाले त्यांना ४९६८ मते मिळाली तर एमआयएम चे सय्यद मतीन यांना ३१२५ मते मिळाली. तिसगाव पंचायत समिती गणातून शिवसेना पक्षाच्या सुनंदा स्वप्निल अळसुळे या १९९ मतांनी विजयी झाल्या त्यांना ३५४२ मते मिळाली तर भारतीय जनता पक्षाच्या कविता मनोज शिरसाट यांना ३३४३ मते मिळाली

## पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण, दुग्ध व्यवसाय आदी विषयांवर झाली सविस्तर चर्चा





**बिड (भगवंत पाळवदे) :** राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची आज जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर व उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भेट घेऊन पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम असून यासाठी जपानचे सहकार्य मोलाचे ठरेल असा विश्वास पर्यावरण व दुग्धविकास मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.समुद्रातील व नदीतील प्रदूषण रोखणे, प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध संयुक्त प्रयत्न करणे तसेच शिक्षण, पशुसंवर्धन आणि सौंदर्यप्रसाधन उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढविण्याबाबतही यावेळी महाराष्ट्र आणि जपानच्या शिष्टमंडळात सकारात्मक चर्चा झालीपर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवास्थानी झालेल्या या बैठकीला जपानच्या सागा प्रांताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सागा प्रांताचे गव्हर्नर योशिनोरी यामागुची यांनी केले. त्यांच्यासमवेत प्रादेशिक देवाणघेवाण विभागाचे उपमहासंचालक मसाहिरो ओनो, आंतरराष्ट्रीय धोरण गटाचे उपसंचालक कोजी योशिताके, प्रकल्प प्रमुख कोकी कनामारू आणि जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा उपस्थित होते.तर राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंह आदी उपस्थित होते.महाराष्ट्राला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. मात्र, समुद्रातून वाहून येणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. त्याचबरोबर नद्यांमधील प्रदूषण हीदेखील चिंतेची बाब असून, भारतीय संस्कृतीत नद्यांचे पवित्र स्थान लक्षात घेता त्यांच्या स्वच्छतेसाठी राज्य शासन विशेष कार्यक्रम हाती घेणार आहे, असे मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले.यावेळी राज्यपाल यामागुची यांनी जपानकडील तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापन अनुभव आणि संशोधन क्षमता महाराष्ट्रासोबत सामायिक करण्याची तयारी दर्शवली. आशियाई समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी "ज्ञान भागीदारी"च्या माध्यमातून संयुक्त उपक्रम राबविण्याबाबत दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिकेवर यावेळी चर्चा झाली दुग्ध व्यवसायावरही बैठकीत चर्चाबैठकीत शिक्षण क्षेत्रातील सहकार्यालाही विशेष महत्त्व देण्यात आले. पर्यावरणीय शाश्वतता, पशुविज्ञान आणि वैज्ञानिक संशोधनासाठी परदेशी विद्यापीठांना राज्यात संधी उपलब्ध करून देण्याची तयारी पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. सागा प्रांतामधील संस्थांबरोबर संयुक्त संशोधन, विद्यार्थी देवाणघेवाण आणि तांत्रिक सहकार्याच्या शक्यता यावरही यावेळी चर्चा झाली.दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील नवकल्पना तसेच सौंदर्यप्रसाधन उद्योगातील जपानचे प्रगत तंत्रज्ञान महाराष्ट्रासाठी उपयुक्त ठरू शकते, असे शिष्टमंडळाने नमूद केले. या क्षेत्रांत औद्योगिक व शैक्षणिक सहकार्य वाढविण्याची परस्पर तयारीही व्यक्त करण्यात आली.पर्यावरण मंत्री यांना जपानचे निमंत्रणप्लास्टिक व्यवस्थापनासाठी उभारण्यात येणाऱ्या वर्ल्ड ओशन प्लास्टिक प्लॅनिंग सेंटर या केंद्राला भेट देण्याचे निमंत्रण राज्यपाल यामागुची यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना दिले.भविष्यात परस्पर दौरे, तांत्रिक कार्यशाळा आणि दीर्घकालीन सहकार्य आराखडा तयार करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.पर्यावरण संरक्षण, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील भारत-जपान सहकार्याला ही बैठक नवे परिमाण देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० फेब्रुवारी २०२६


## शुद्ध वैचारिकतेतून आणि आचरणातून मानवतावादाची पायाभरणी शक्य : प्रा. डॉ. म. सु. पगारे




**एरंडोल :** दोन डोळे, दोन कान, एक नाक, दोन हात आणि पाय असा हाडामासांचा बनलेला माणूस म्हणजे खऱ्या अर्थाने माणूस नव्हे. माणसाचं माणूसपण त्याच्या विचारातून आणि त्याच्या आचरणातून झळकते. शुद्ध आणि वैश्विक विचार करणारी संस्कृती आणि संस्कार जर संबंध विश्वात जर जोपासले गेले तर मानवतावादाची पायाभरणी सहज शक्य आणि सुकर होईल असे प्रतिपादन प्रा. डॉ. म.सू. पगारे यांनी केले. दि.०८फेब्रुवारी २०२६ रोजी सूर्योदय जेष्ठ नागरिक संघ एरंडोल येथे आयोजित,प्रा.वा. ना.आंधळे यांनी अहिराणी बोलीत अनुवादित केलेल्या 'बा,तथागता!' या विशाल कवितेच्या ग्रंथाचे व याच ग्रंथावरील 'विवेकी जाणिवांचा प्रज्ञा प्रवाह' या समीक्षा ग्रंथाचे प्रकाशन बौद्ध तत्वज्ञानाचे अभ्यासक व मेडिटेशन तज्ज्ञ आचार्य मनोहरजी सुरदास यांचे शुभहस्ते संपन्न झाले.त्यावेळी सुप्रसिद्ध मानवतावादी विचारवन्त,समीक्षक,साहित्यिक तथा कवी प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून आपले विचार श्रोतृ समुदायासमोर मांडलेत. ते आपल्या चिंतनातून पुढे म्हणाले की, बुद्ध तत्त्वज्ञानातून खऱ्या अर्थाने मानवतावाद प्रस्फुटित होईल. कारण बुद्धतत्त्वज्ञानामध्ये सत्याला भिडण्यासाठीची भूमिका पहिल्यांदा घ्यावी लागते आणि सत्यान्वेषी प्रवास जीवनाच्या अखेर पर्यंत करावा लागतो. त्यासाठीची प्रत्येक माणसाची आचारसंहिता, वैचारिकता आणि माणूसपणाचे सर्व कांगोरे घासून पुसून चकचकीत करावे लागतात. शुद्ध माणूस होण्यासाठी, परिशुद्ध होण्यासाठी आणि परिशुद्ध असलेला माणूस हा खऱ्या अर्थाने मानवतावादाचा निदर्शक आहे. जात-पात, उच-नीच, काळा-गोरा या भेदांच्या भिंती संपूर्णपणे कोलमडून नव्या युगामध्ये बुद्धतत्त्वज्ञानातसह मानवतावादाची माणसापरत्वे पेरणी व्हायला हवी आणि सबंध विश्वच बंधुभाव, न्याय, प्रेम, स्वातंत्र्य, मैत्री, करुणा, या युक्त गुणांनी उजळून निघायला हवे. बुद्ध तत्त्वज्ञानामध्ये 'माणूस' आणि माणसाचे 'मन' ही मानवतावादाची केंद्रवर्ती प्रयोगशाळा आहे असे म्हणता येईल. त्यासाठी मानवाच्या संस्कारक्षम मनावर वेगवेगळ्या पैलूंनी संस्कार करून मनाला परिशुद्ध करण्याचा प्रयत्न अखिल मानव जातीला खुणावत आहे. आज मितीला माणूस हे सगळे विसरत चाललेला आहे. असं दिसत असताना माणूस आणि माणूसकीची व्याख्या नव्याने करण्याची गरज भासली आहे. जगातील दुःखाचा नायनाट सुद्धा याच विचारातून करता येऊ शकतो, त्यासाठी मानवी मनाला संस्कारक्षम बनवण्याच्या अनुषंगाने परिशुद्तेकडे घेऊन जाता येईल आणि परिशुद्ध झालेले मन आपणा सर्वांना मानवतावादाचे सुखद रूप प्रकट करून देईल यातच मानवी जीवन कल्याणाचे ध्येय लपलेले आहे.मानवतावादाच्या अनुषंगाने 'बा, तथागता' या अनुवादित साहित्यकृतीवर पावणे दोन तास चाललेल्या डॉ.पगारे यांच्या चिंतन वर्षावाने श्रोतावर्ग अक्षरशः मंत्रमुग्ध झाला. यावेळी प्रमुख अतिथी बौद्ध तत्वज्ञानाचे अभ्यासक तथा मेडिटेशन तज्ज्ञ आचार्य मनोहरजी सुरदास यांनी मानवी मनाच्या अवस्थांना हात घालीत षड्रिपु पासून कशी सुटका करावी व मानवी कल्याणाच्या वाटेने कसा प्रवास करावा.,यावर प्रकाश टाकीत 'बा,तथागता' हे विशाल काव्य मानवी जीवनासाठी दिपस्तंभासारखे कामी येईल हा विश्वास व्यक्त करीत डॉ.पगारे यांना मूळ मराठी साहित्यकृतीचे जनक म्हणून आणि प्रा.आंधळे यांनी या साहित्यकृतीचा अस्सल अहिराणीतून अनुवाद केला म्हणून दोघा कवींचे हे ऐतिहासिक काम असून ते विश्वकल्याणकारी असल्याचे म्हणत दोन्ही कवींचे त्यांनी अभिनंदन केले. या समारंभात समीक्षा ग्रंथासाठी लेखन करणाऱ्या समीक्षकांना शाल,समीक्षा ग्रंथ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.त्यात डॉ.नरेंद्र बापूजी खैरनार (साक्री),डॉ.रमेश सूर्यवंशी(कन्नड),नानाभाऊ माळी(हडपसर,पुणे), डॉ. देवदत्त बोरसे(बागलाण नामपूर),कैलास पाटील(जळगाव),खेमराज पाटील(जळगाव),रमेश धनगर (गिरड-पाचोरा), डॉ. विजय शिरसाठ(चाळीसगाव), रमेश बोरसे (धुळे), सौ. रत्ना पाटील (फागणे), डॉ.माधव कदम(नंदुरबार),डॉ. वाल्मिक अहिरे(वडजी-भडगाव),श्रीमती लतिका चौधरी(दोंडाईचा) यांचा सहभाग होता. बा, तथागता या विशाल काव्याचे अहिराणीअनुवादक व समीक्षा ग्रंथाचे संपादक प्रा.वा. ना.आंधळे यांचा सपत्निक सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. अनुवादाची भूमिका प्रास्ताविकातून स्पष्ट करीत अतिथींचा परिचय अनुवादक व संपादक प्रा.वा. ना.आंधळे यांनी करून दिला तर संपूर्ण कार्यक्रमाचे अतिशय मनोहारी सूत्रसंचालन प्रा.खेमराज पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन कवी निंबा पुना बडगुजर यांनी केले.संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन सूर्योदय जेष्ठ नागरिक संघाचे संचालक कवी पी.जी.चौधरी सर व कवी निंबा पुना बडगुजर,विनायक कुलकर्णी,कवी झांबरे प्रा.कैलास पाटील,डॉ.दीपक खरात, कमलनाम प्रतिष्ठानचे खजिनदार दिनेशभाऊ घुगे, सौरभ घुगे यांनी अथक परिश्रम घेतले.

## हृदयाची धडपड

सखी तुझ्या येण्याने,हृदयाची धडधड वाढते.
दूर गेल्यावर मात्र,तुझीच आठवण काढते.

रोज रोज तुझीच,आठवण काढत बसतो.
अचानक दिसता पुढे, हळूच गालात हसतो.

तुझ्या नजरेचा वार, आता सहन होत नाही.
तुझ्या पावलांचे ठसे, वेडे मन पहात राही.

माझे मन तुझ्यावर, सखी झाले आता फिदा.
तुझे प्रेमामध्ये,हसत राहणे आहे खूप छान अदा.

प्रेम करतो तुझ्यावर,होशील का माझी राधा.
जीवनभर साथ देईन, करून प्रेमात वादा.

तुझे माझे प्रेम आता,जगात अमर होऊ दे.
प्रेम करतो तुझ्यावर,कायम मनात राहू दे.

प्रेम म्हणजे प्रेम असते,दोन हृदयांची वस्ती वसते.
प्रेमामध्ये जगतांना,दोन हृदयांची धडपड दिसते.



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० फेब्रुवारी २०२६


## उरामध्ये आग

शेत शिवाराच्या ! उरामध्ये आग !
काळजात धग! कुणब्याच्या !!

तणांचा हैदोस! वाढला पिकात!!
खुरपे कोमात ! नेमकेच!

आता आभाळाचे! आटलेय डोळे!
रानवारे भोळे! थकलेले !!

करपले पीक! भेगाळले रान!
पावसाचे दान! कोरडेच!!

गाव पाखरांच्या! जगण्याचे वांधे!
बगळ्यांचे धंदे! वाढलेले!!

कष्टाच्या वहीत! गहाण नशिब !
घामाचे हिशोब! चुकलेले !!



**- ज्ञानेश्वर गायके,
कन्नड**

# डॉ. नितीन वाकळे यांचा तिफण परिवार तर्फे गौरव



**कन्नड :** कन्नड तालुक्यातील नावडी येथील रहिवासी असलेले समाजकार्य विषयातील अभ्यासक डॉ. नितीन वाकळे यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल तिफण परिवार, कन्नड तर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.डॉ. नितीन वाकळे यांनी आंतरविद्याशाखेतर्गत समाजकार्य विषयात “ग्रामीण किशोरवयीन मुलांच्या आरोग्य विषयक सजगतेचे अध्ययन” (विशेष संदर्भ : छत्रपती संभाजीनगर जिल्हा) या विषयावर संशोधन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या संशोधन कार्यासाठी अंबाजोगाई येथील मानवलोक समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्रातील प्रा. डॉ. रमा अच्युत पांडे यांचे मार्गदर्शन लाभले.अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातून शिक्षणाची वाटचाल करत उच्च शिक्षण प्राप्त करणारे डॉ. वाकळे सध्या यवतमाळ जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागात आरोग्य निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य सजगतेवर केलेले त्यांचे संशोधन समाजोपयोगी ठरणारे आहे.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कन्नड तालुका साहित्य परिवार तर्फे कवी ज्ञानेश्वर गायके, कवी लक्ष्मण वाल्डे, श्री. उत्तम गिरी व श्री. अविनाश सुसलादे यांच्या हस्ते शाल-श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच तिफण परिवार, कन्नडचे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. शिवाजी हुसे, ॲड. कृष्णा पाटील जाधव, प्राचार्य डॉ. विजय भोसले, रानकवी श्री अरुण थोरात, संदीप वाकडे आदी मान्यवरांनी डॉ. वाकळे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# इकरा पब्लिक स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप; गुणवंतांचा ट्रॉफी देऊन गौरव





**मोहाडी :** येथील इकरा पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि भव्य पारितोषिक वितरण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.करीम सालार होते.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा आणि आध्यात्मिक प्रगतीचा गौरव करणारा हा सोहळा शाळेच्या आदर्श परंपरेचा साक्षीदार ठरला.या सोहळ्यात शैक्षणिक वर्षातील अष्टपैलू कामगिरीबद्दल कु. आयेशा शेख झहीर आणि असजद हुसेन यांना 'स्टुडंट ऑफ द इयर' या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. क्रीडा क्षेत्रात शाळेचे नाव उज्ज्वल करणाऱ्या मास्टर रय्यान नाझिम आणि राहिल सगीर यांना 'सर्वोत्कृष्ट खेळाडू' ट्रॉफी प्रदान करण्यात आली.तसेच, मुलांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना व्हावी या उद्देशाने देण्यात येणारा 'स्टार ऑफ द प्रेयर' पुरस्कार शिफा साबीर व हुजेफा रफिक यांना प्रदान करण्यात आला.मागील वर्षाच्या बोर्ड परीक्षेत सुयश संपादन करणाऱ्या गुणवंतांना सालार फाउंडेशन, मलिक फाउंडेशन आणि शाहकार फाउंडेशनतर्फे सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेचे यशस्वी माजी विद्यार्थी डॉ. साकिब (MBBS - वैद्यकीय अधिकारी,हिंगोणा),डॉ.रियाज बागवान (MBBS) आणि शाहिद शफीकुद्दीन (TET/CET यशोगाथा) यांची उपस्थिती.या यशस्वी तरुणांना पाहून उपस्थित विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेतली.यावेळी एजाज मलिक, इरफान सालार, रमीज बादलीवाला,कारी कुद्दुस आणि काझी जमीर यांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली.अमीन भाई बादलीवाला व माजिद झकेरिया यांच्या उपस्थितीने सोहळ्याची रंगत वाढली. श्री. इश्तियाक अहमद यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन केले, तर शाळेच्या शिक्षक वृंदांने हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अतोनात परिश्रम घेतले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० फेब्रुवारी २०२६


# शब्दशस्त्रांचा धारदार विद्रोही निर्धार : हुलबिगूल




पुस्तकाचे नांव:-हुलबिगूलकवी:- प्रा डॉ सखाराम डाखोरे प्रकाशक:-गीतेश गजानन शिंदे प्रकाशक:-सृजनसंवाद प्रकाशन, ठाणे मुखपृष्ठ व रेखाटने:-सरदार जाधव प्रथमआवृत्ती:-१५नोंव्हेबर २०२५.पुस्तक परिचय:- डॉ. प्रभाकर शेळके जालना किंमत:- ३००/रूपयेशब्दशस्त्रांचा धारदार विद्रोही निर्धार:-हुलबिगुल मराठवाड्यातील जिंतूर तालुक्यातील केहाळ या दुष्काळग्रस्त गावातील स्नेहाळू सन्मित्र कवीस्नेही डॉ.सखाराम डाखोरे यांच्या कवितेने मन पिळवटून गेले.या समकालातही आदिवासींची कधी दखल घेतं नाही.ही गाभडलेली व्यवस्था फक्त राजकारणाच्या मतधिक्यासाठी त्यांचा वापर करते.कवी सखेद वेदनेची ही ठणक आहे ती अशी,'कुपोषण,भूकबळी,दारीद्रय, बेरोजगारी, हिंदू-ख्रिश्चन धार्मिक आक्रमण आणि आदिवासी संस्कृतीचे झालेले विद्रूपीकरण यासर्वांच्या विरोधात पुन्हा एकदा नाहीतर हजारदा बंड करण्याची गरज निर्माण झाली आहे.मुंडा ओरॉंव,आंध,भील्ल गोंड प्रधान,माडिया, वारली,महादेव कोळी,कोकणा, कातकरी अशा देशभरातील अनेक जमातीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.(पृष्ठ २०मनोगत)त्यांच्या भूक भाकरीचा प्रश्न कायमचं आहे.त्यांच्या संस्कृती परंपरेचा फक्त दिखावा व फलकांचे उदात्तीकरण करते.आदिवासींच्या जीवन संघर्षला ही अर्पण पत्रिकेच स्मरण.'जल जंगल,जमीनीच्या लढ्यात शहीद झालेल्या असंख्य आदिवासी क्रांतिकारकांना..!'अन्न पाणी वस्त्र या मानवाच्या मुलभूत गरजा.स्वातंत्र्य मिळालं पण अजूनही आदिम समाज कोसो मैल दूर आहे.संवैधानिक संविधान अभ्यासून क्रांतीची मशाल घेऊन एक सृजनशील निस्सीम भूमियांची भूमिका घेऊन सर्वहारा आदिमांचा आवाज घेऊन ही कविता आली आहे.जल,जंगल जमीन म्हणजे 'महिपती'म्हणजे या भूमीचा राजा हा आदिवासी होता."गौतमांची शांती हो,बिरसाची क्रांती होराघोजीचं सौर्य हो,बाबासाहेबांचं धैर्य होरक्त आहे तुझं अनार्याचंपरकिय आर्यांसाठी जीवन त्यागू नकोस उपाशी मेला तरी चालेल लाचार होऊन भीक मागू नकोस..!"(पृष्ठ ६७)ही क्रांतीची मशाल ही कविता पेटवते.हे युगानूंयुगाचं आदिम जगणं वनवासी जगण्याची प्रचंड कुतरओढ कायमचं आहे.या कवितेचा मर्मग्राही प्रतिमांचा आविष्कार असा आहे.' मानवतावादी मूल्य तुडवणाऱ्यांची,शिकार झालीच पाहिजे.माझं पुरोगामित्व मी विकणार नाही.त्यांनी उध्वस्त केले सिंधूस्तान, अध्यात्माचे वांझ बियाणे, आमच्या जंगलाला अगी लावून, शायनिंग इंडियाच्या बाता, तुमच्या शास्त्रांना मारतो मी फाट्यावर..!ही कविता प्रचंड पोटतिडकीने आली असल्याने चिंतनाची डुब आणि सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक अधिष्ठान या कवितेमधून येते.ही कविता अतिशय नव्याने हुलबिगूल वाजवते आहे.आता थांबने नाही.इथली भंगार व्यवस्था आदिमाचा हरेक प्रकारे फक्त फायदा घेते आहे.यात त्यांचे जल जंगल जमीन तर आहेच पण त्यांच्या घामाचे मोल त्यांना मिळतं नाही.तर त्यांच्या जात सवलतीवर ही हलकटपणाने सोयी सवलतीचां डल्ला मारल्या जातो आहे.ही खदखदनारी सल उजागर करण्याचं धैर्य हे कवितेनं केलं आहे.कवीहुलबिगूल वाजून लिहितो,"आपण खेकड्याच्या वृतीचे नाहीतहे दाखवून दिलं पाहिजे जगाला...आपण एकलव्य,बिरसाच्या रक्ताचे नीडर योध्दे आहोत याची खात्री झाली पाहिजे सनातनी व्यवस्थेला..(पृष्ठ ६०)या सनातन वेदनांची खपली धरून कवीने मोठ्या प्रमाणात हुल शब्दशस्त्रांचा विद्रोही बिगूल वाजवून नव्या आदिम सूर्याची तेजोमय पहाट करण्याचं सृजनशील शस्त्र उगारलं आहे.जसं ही जमीन,जंगल,डोंगर जल आमची यावर कंपन्या,आश्रम,टावर, पाण्याची तहान तुमची.. आम्ही मुळमालक,पण तुम्ही मालकशाही गाजविणारे ढेरपोटे ढेरकांड्यांनो!हे थांबलं पाहिजे म्हणून हाआक्रोशाचा हुलबिगूल.. आदिवासींच्या विकासासाठी केवळ चित्र आखल्या जाते.ते सोशल मीडियाच्या माध्यमातून झक्कासपणे दाखविले जाते.पण प्रत्यक्षात तेशुन्यचं असते.आदिवाशी ,जल,जंगल, जमीनीच्या कुशीत राहणारे,दमदार दिलदार,चतूर, चाणाक्ष तसे भोळे -भाबडे,या मायभूमीचे खरे रक्षक, निसर्ग वैभवाचा वारसा जतन करणारे, मानवी मूल्ये,कला परंपरा,न्याय-समता-मानवता-बंधूत्वाचे पायिकत्व ठेणारे.हे सत्य सत्व कवीने मांडले पण इथेच काही भाडखाऊ गुलाम होऊन, सत्तेसाठी लाचार,भडवे होऊन गोडवे गाणारे.यावर कवीची निर्धारककविता आहे,जसे, "तुमच्या दळभद्री राजकारणा-नेमाणूस जातीजातीत वाटला गेला आहे..हजारो डिग्र्या मिळून ही,त्यांचा अंगठा छाटला गेला आहे..! लाखो करोडोची बोली बोलणाऱ्या, तुमच्या शिक्षण संस्था आहेत.तरीही फुले- शाहू आंबेडकरांवर तुमच्या आस्था खऱ्या आहेत"(पृष्ठ ५३)या समकालीनत ही कविता मनाला मुर्गाळून टाकते.या व्यवस्थेत तो जातीच्या गचपनात केवळ झाकणझुल्या होतो आहे म्हणून हे वास्तव डोळ्यात अंजन घालणारे आहे.कवीने अतिशय धारदार विचारांच्या प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर हे या कवितेचा आत्मानुबंध आहे.मी उच्चविद्याविभूषित झालो पण माझा आदिवासी बांधव अजूनही भयभीत होऊनच जगतो आहे.म्हणून हे,"होय!थांबवलचं पाहिजे आदिवासींची दिशाभूल करणाऱ्यांना आदिवासींना हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन बनवणाऱ्यांनाहोय आम्ही आदिवासी पशू-पक्षी-प्राण्यांचे मित्र आम्ही निसर्गावर प्रेम करणारे आम्ही..!"(पृष्ठ ४७)या मायभूच्या वनवासी लेकरांची व्यथा वेदना स्वातंत्र्यानंतर ही कायमचं आहे.ही माती हे डोंगर,पोखरून तुमच्या घरांना विटामांती मुरुम खडक सागवानी दरवाजे आमचे.वर तुम्हीचं बोंब ठोकून 'जंगल बचावचा' दांगडू करने अन् आदिवासींना पकडून शिक्षा करणे. हे वास्तव नाकारता येत नाही.आमच्या आयुर्वेदिक औषधी वनस्पती.तुमचे मेडिकल हब,तुम्ही अंधश्रद्धेच्या बाजारातील दलाल.गोंदण ही आमची संस्कृतीक परंपरा पण तुम्ही टॅटू काढून अंगप्रदर्शन मा◌ॅडलिंग करून आमची तुबांड बदनामी करता आहेत.ही कविता संयत मनोभूमिकेतूनअस्सल आदिवासींचे जगणे मांडते.आपल्या श्रध्देय भावनेत, सूर्य, चंद्र आभाळ माती झाडे झरे डोंगर या निसर्गाला दैवत मानून गपगुमान जगणारी उघडी बोडखी,देहाची माती अन् मातीला कष्टाचा श्वास देऊन झांडाची पुजा बांधणारी हीआदिम जमात.आता माणूस म्हणून जगू द्या अशी क्रांतीचे हुलबिगूल कविता आहे.आजचे वास्तव.बाप जात नाही शिकारीला, माय जात नाही डिंक, मव्हळ कांदा काढायला, भाऊ, लाहुरी तित्तर, ससे घोरपडी,हरणा धरायला. जंगलचं राहिलं नाही. वढे, खोंगळ्या नद्या साऱ्या वाळू खंगाळून उपसून घेऊन गेले शहरात.यामुळेच बिबट्या घुसला घरात. फास, फांझर, जाळे, वाघुर मासे खेकडे, आता राहिले नाही.पाझर तलावाचं धनदांड-ग्याने याचा व्यापार धंदाचंकेला यामुळे ही आदिवासी पुन्हा वनवासी झाला.या साऱ्या जगण्याच्या गोष्टीवर ही कविता प्रखर भाष्य करते.आम्ही अजूनही 'मूलभूत हक्कांपासून वंचित अहोत.लोकशाही संविधानांचे अधिकार आजपावेतो आदिवासींना मिळाले नाही.जागतिकीकरण आलं म्हणता. मोलमजुरी करून पोट भरणारे, नोकरीसाठी भटकंती करणारे अजूनही आहेत.ही सल घेऊन ही कविता संयत ज्ञान उद्युक्तेने येते आहे.हा हुलबिगल ज्ञानसाधनेचा आहे.श्रेध्दय बिरसा मुंडा,यांचे पहिले उलगुलान हे ब्रिटीशांना, सावकारांना हादरून टाकणारे होते.'कवी 'धरतीआबाला'आजचे वास्तव सांगतो,महानग दावणीचे,चाटुगिरी,भाटूगिरी,कर णारे भाट, कोटवाले, नोटवालेसुटवाले, बुटवाले. यांनी आपल्याच लोकांच्या योजना घाशात घालाणारे दलाल.. तुझ्यामुळेच समाज संघटीत झाला. ही संघटनेची वज्रमूठ या कवितेने पुन्हा पक्की केली आहे.हुल म्हणजे क्रांती,विद्रोह लढा युद्ध आहे.मानवीमूल्य न्याय समता बंधुता व मानवतेसाठीची एकता.म्हणून हुलबिगूल हा एक संविधान विचारांचा आहे.कवी डॉ सखाराम डाखोरे कवितेतून मुक्त चिंतन व्यक्त करतात "आदिवासी समाज जीवनातील भयावहता, दारिद्य,धर्म संस्कृती विषयीचे वास्तव शेती, मोलमजुरी,सालगडी म्हणून काम करणाऱ्या हजारो पिढ्या आजही वेदना भोगत जगताना दिसताहेत.शहरीकरणाच्या पसाऱ्याने आणि मृत्यूच्या भयग्रस्ततेने मनाला पीळ पडतो आहे.अशा झाकोळतून कविता जन्मते आहे.हे निर्भय जगण्याचं बळ कविता देते".(पृष्ठ ८)हे कवीचे मनोज्ञ मत म्हणजे ही निर्धाराची कविता आहे.विद्यापीठीय अभ्यासक्रमात आंधी' बोलीचा समावेश आहे.सिकोन, निसरगाचा रंग,माजुरडे,वखुत,कहीपसून मनती माय.या संग्रहात ही बीन्नीची कविता. 'पख्ख उपटेल पखरू,जीतंऱ्हाणार काय?'कहीपसून मनती माय..आज अशीच अवस्था या व्यवस्थेने आदिवासींची केलेली आहे.म्हणूनहा हुलबिगूलांचा कल्लोळ ही कविता होऊन आली आहे.आदिवासी साहित्यिक अभ्यासक डॉ प्रभू राजगडकर लिहितात "आदिवासींच्या विद्रोहाचे पाणी पेटले आहे 'हुल'या शब्दाचा अर्थच क्रांती-विद्रोह असा आहे.आजही बिहार -झारखंड-ओडिसा-मध्यप्रदेश-बस्तर छत्तीसगड -महाराष्ट्र-गुजरात तेलंगणा या आदिवासी बहुल प्रांतामध्ये आदिवासींचे लढे सुरूच आहे.अन्याविरूध ते'हुलबिगूल'पुकारत आहेत.बिगूल एक वाद्य आहे आणि 'हुलबिगूल'चा अर्थ अन्याय-अत्याचार-शोषणाविरूध पुकारलेला आवाज.'हुलबिगूल' आदिवासींच्या क्रांतीचा आवाज आहे.कवी सखाराम डाखोरे यांनी आपल्या कवितेमधून हा आदिवासींचा आवाज अधिक प्रखर केला आहे (मलपृष्ठ) सरदार जाधव यांचे अतिशय चिंतन आशय संपन्न मुखपृष्ठ व रेखाटने आहेत.सृजनसंवाद प्रकाशक संपादक गीतेश गजानन शिंदे यांनी काव्यसंग्रहाची अतिशय उत्कृष्ट बांधणी केली आहे.कवीवर्य सन्मित्र मनस्वी हार्दिक शुभेच्छा.



डॉ प्रभाकर शेळके, जालना


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० फेब्रुवारी २०२६


## कला महाविद्यालयाचा कृष्णापुर येथे रासेयो शिबिराचा समारोप





**बिडकीन** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर संलग्नित, एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे कला महाविद्यालय बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजी नगर या महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत सात दिवसीय निवासी विशेष श्रमदान शिबिर दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये मौजे कृष्णापुर ता. पैठण येथे "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन शाश्वत विकास साठी युवा "या संकल्पनेवर आधारित घेण्यात आला या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, स्वयंसेविका यांना दररोज सकाळी प्राणायाम, योगासने , तदनंतर चहा अल्पोपहारानतर श्रमदान, श्रमदानंतर दुपारी ०२.०० ते ०४.०० बौद्धिक सत्र, संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रम, पथनाट्य, कविता वाचन, अंधश्रद्धा निर्मूलन, जादूचे प्रयोग अशा अनेक विषयावरती अतिशय दर्जेदार निवासी कॅम्प घेण्यात आला. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सात दिवस राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी मौजे कृष्णापूर येथे गाव स्वच्छता , मतदान जनजागृती, आरोग्य शिबिर , जनावरांचे लसीकरण, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूणहत्या जनजागृती अशा अनेक विषयावरती गावकऱ्यांची जनजागृती केली. रोज दुपारी ०२. ते ०४ या वेळेत बौद्धिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते .यामध्ये डॉ. राजाराम बडगे, डॉ. दैवत सावंत ,डॉ.संजय शिंदे ,डॉ. प्राचार्य ,हसन इनामदार डॉ.अजय पवार यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि वैचारिक मार्गदर्शन "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन शाश्वत विकासासाठी युवा" या संकल्पनेवर वेगवेगळ्या विषयावर आपले विचार मांडले समारोपाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश गायकवाड यांनी करताना विद्यापीठाने ठरवून दिलेल्या सर्व बाबींचा समावेश निवासी शिबिरामध्ये करण्याचा प्रयत्न आणि महाविद्यालयाची परंपरा अखंडित ठेवण्याच्या हेतूने सर्व उपक्रम घेण्यात आले याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय धडाकेबाज राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे यांनी केले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल कांबळे एस.बी.स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बिडकीन हे उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजनेतून उद्याचे नेतृत्व जन्माला येते आणी तुम्हीच भावी देशाचे आधारस्तंभ आहात असे वक्तव्य केले अत्यंत वास्तव आणि महाविद्यालयीन जीवनातील अनुभवाचे दाखले देत विद्यार्थ्यांमध्ये हशा पिकवला त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे अनेक दाखले देत हेच भावी सामाजिक, राजकीय अधिकारी क्षेत्रामध्ये आपले भविष्य उज्वल करू शकतात त्यामुळे सामाजिक समतेचा आणि संत गाडगे महाराज यांनी दिलेला स्वच्छतेचा मूलमंत्र मनी ठेवून जर आपण वर्तन केले तर जीवनात कधीही अपयश येऊ शकत नाही असे मौलिक मार्गदर्शन केले. दुसरे पाहुणे प्रा. अनिल गवळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थ्यांच्या जीवनात आणी जडणघडणीत महत्त्वाचा उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःहून झोकून घ्यावे ,राष्ट्रासाठी देशासाठी काम करावे यातूनच चांगल्या नेतृत्वगुण उदयास येते असे विचार मांडले. कार्यक्रमासाठी कृष्णापूरचे सरपंच सौ.जयश्री दळवी, सामाजिक कार्यकर्ते वैभव राज दळवी, ग्रामपंचायत सदस्य अमृता अंकुश काळे, उपसरपंच जाधव साहेब, ज्येष्ठ समाजसेवक, कृष्णा वाघ, सितारामजी आव्हाड, मोहन गिरी, यांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरासाठी विशेष सहकार्य केले. या शिबिरामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना कला महाविद्यालय बिडकीन स्वयंसेवक स्वयंसेविका यांना प्रमाणपत्र व मेडल देऊन पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले त्याचबरोबर या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन आहेर यांनी महाविद्यालयाच्या सात दिवशीय शिबरातील उपक्रमाविषयी कौतुक केले व आज समारोपाला मिळालेला पाहुणा हा अतिशय बोलका अभ्यासू आणि विद्यार्थ्यांना खेळवून ठेवणारा उपलब्ध केल्यामुळे त्यांनी कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठोकळे यांचे कौतुक केले शेवटी हे शिबिर यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश गायकवाड प्रा. मिलिंद ठोकळे , डॉ. अंजली काळे, डॉ. अर्चना काटकर यांनी अतिशय मेहनत घेऊन अतिशय उत्कृष्ट सात दिवसीय निवासी शिबिर यशस्वी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. युसुफ पठाण डॉ.रामकिसन मुंडे डॉ.मुक्तार शेख ,डॉ.मुजीब सय्यद, डॉ.अर्चना काटकर, डॉ. वैशाली पेरके, डॉ. मोहसीन शेख ,डॉ. प्रसाद करंदीकर प्रशासकीय कर्मचारी संभाजीराव आंधळे, अण्णासाहेब थिटे सेवक नशीर शेख इत्यादींचे सहकार्य लाभले या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. अर्चना काटकर यांनी केले आणि अध्यक्षाच्या परवानगीने कार्यक्रम संपला असे जाहीर केले.


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस
DMLT कालावधी १ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
C.T.SCAN कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
E.C.G. कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
O.T. TECHNICIAN कालावधी २ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
PG RADIOLOGY कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर) पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
9405109103 | 8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० फेब्रुवारी २०२६


## "आंबेडकरी विचार केवळ ग्रंथात न अडकवता कृती कार्य साहित्य संस्कृतीमध्ये उतरू द्या" लेखक दिग्दर्शक प्रकाश त्रिभुवन




**छत्रपती संभाजीनगर** : "विद्यार्थ्यांनी आंबेडकरी विचार तत्वज्ञान विद्यार्थी दशेतच आत्मसात करून प्रज्ञा शील स्वाभिमान अंगिकार करावा,विद्यार्थी कसा असावा हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः मिलिंद प्रश्न ग्रंथातून आत्मसात करावा तसेच अभ्यासासह आंबेडकरी विचार केवळ ग्रंथात न अडकवता कृती कार्य साहित्य नाट्य संस्कृतीमध्ये उतरू द्या " असे विचार ख्यातनाम लेखक दिग्दर्शक प्रकाश त्रिभुवन यांनी व्यक्त केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलतांना प्रकाश त्रिभुवन यांनी विद्यार्थ्यांना कथा काव्य नाट्य चित्रपट आधुनिक समाजमाध्यमातून व्यक्त होतांनाच आंबेडकरी विचार शील व स्वाभिमानाची जाणीव ठेऊन व्यक्त व्हावे, नागसेन परिसर ही विचार कार्य कृती चळवळीची ऊर्जाभूमी असल्याचे स्पष्ट केले.पाहुण्यांच्या हस्ते वर्षभरातील शिक्षण क्रिडा साहित्य सांस्कृतिक वादविवाद वक्तृत्व विविध गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, बक्षीस वितरण करण्यात आले.उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. आर. व्ही. मस्के यांनी केला. उदघाटकीय सत्रानंतर विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात बुद्ध वंदना, भीमगीते,देशभक्तीपर गीते ,लोकगीत लोकनृत्य पोवाडे विनोदी नाट्य,गीत नृत्याचा सांस्कृतिक आविष्कार सादर करण्यात आला.यावेळी वार्षिक अहवाल डॉ. बी. एन. शिंदे यांनी सादर केला, कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. एन. एम. करडे, डॉ. एस. पी. खिल्लारे, डॉ. एस. पी. बुधवंत, प्रा अशोक बारगजे, प्रा अनिता वेंकेश्वर, प्रा छाया बाथम, डॉ. राहूल मोरे अधिक्षक राजू पट्टेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नवनाथ गोरे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. प्रज्ञा रुईकर साळवे, डॉ. सतीश वाघमारे यांनी केले,सांस्कृतिक कार्यक्रम आदित्य इंगळे यांनी संयोजन केले, कार्यक्रमासाठी डॉ. पूजा वडमारे, डॉ. रेश्मा गरड, डॉ. प्रेमराज वाघमारे, डॉ. अशोक केवटे, डॉ. सुनील सोनवणे, डॉ. राजीव वानखेडे, डॉ. सूनील गायसमुद्रे, डॉ. कुणाल साळवे, डॉ. महेश आकुलवार, डॉ. गणेश खिल्लारे, डॉ. विजय आडे, डॉ. गौतम घाडगे, यांच्यासह प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले, यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी डॉ. व्ही. जी. पिंगळे यांनी आभार व्यक्त केले.

## भगवान विद्यालय आडगाव बु. येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**आडगाव** : तालुका जिल्हा छत्रपती संभाजीनगर : येथील भगवान विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संजय देसले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून राजीव वाघ सर, विजय वर्मा इत्यादी उपस्थित होते याप्रसंगी पगारे सर शिरसाट सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच कुमारी मोनिका डवले, अक्षदा घोडके, दिव्या गायकवाड, तेजस्विनी दसपुते इत्यादी विद्यार्थिनींना आपले मनोगत व्यक्त केले इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी मदत केली तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बडधे सर यांनी केले

## मनपा शाळेच्या मनीषाने पटकावले हॅकथॉनचे प्रथम पारितोषिक




**छत्रपती संभाजीनगर** : प्रोजेक्ट जिज्ञासा स्टेम व मनपा शिक्षण विभाग छत्रपती संभाजी नगर यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित , मनपा प्रशासक जी श्रीकांत सर यांच्या स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल या संकल्पनेतून. आयोजित सिटी लेव्हल एक्झिबिशन हॅकथोन चॅलेंज स्पर्धेमध्ये मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेची विद्यार्थिनी मनीषा गौतम उबाळे प्रथम रनर अप विजेती ठरली. शाळेचे मुख्याध्यापक श्री.पी.पी.शिंदे सर यांनी तिचे अभिनंदन केले. विज्ञान शिक्षिका श्रीमती मनीषा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच या कार्यक्रमासाठी श्री.पठाण सर उपस्थित होते.तिचे व शाळेचे मनपूर्वक अभिनंदन

## अभंग संपदेचं देहू गावी होणार प्रकाशन

**देहू** : सामाजिक,संप्रदायिक आणि शिक्षण या विभागामध्ये आपले आयुष समर्पित केलेल्या अनेक नामवंत,गुणवंताच्या सामूहिक प्रयत्नातून अभंग संपदा प्रातिनिधिक ग्रंथाचे जगद्गुरु तुकोबाराय यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या महाराष्ट्रातील देहूगावी प्रकाशन होणार आहे.ह्या सोहळ्यास महाराष्ट्र लोकविकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ (अण्णा) तोडकर प्राचार्य गोविंद बिराजदार,प्राचार्य वेंकट अणिगुंटे, जागतिक लेवलवरचे पाणी संशोधक अभ्यासक सामाजिक कार्यकर्ते विलास कुलकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील अनेक गुणवंत साहित्यिक सांप्रदायिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.या कार्यक्रमाचे आयोजन काव्यप्रेमी महाराष्ट्र आणि उत्तरदायित्व एनजिओ फाउंडेशन या स्वयंसेवी संघटनेच्या वतीने केले जाणार असल्याची माहिती फाउंडेशनचे विश्वस्त प्रमुख श्रुतीताई डिंबळे,नागेश गायकवाड, हरिचंद्र ढाकणे यांनी केले आहे.अभंग संपदेतील साहित्यिकांना ट्रॉफी देऊन प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते सन्मानित केले जाणार आहे.तर इतर सहभागी साहित्यिक कवी यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.अभंग संपदेचे संपादक भूमिपुत्र वाघ,सुधाकर झिंगाडे, कमलाकर भोसले, विकास राठोड,तसेच प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण पवार यांची उपस्थिती असणार आहे.हा प्रकाशन सोहळा दिनांक १७/०२/२०२६.सकाळी ११ते ०३ वाजता अभंग मंगल कार्यालय गाथा मंदिर रोड देहूगाव.येथे होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. विविध क्षेत्रातील साहित्यिकांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहनही केले आहे..


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० फेब्रुवारी २०२६


# यूजीसीची समता नियमावली : शिक्षण ही सामाजिक उच्चभ्रूंची जहागीर असू शकत नाही

**प्रिया दर्शन (जालना)** : उच्च शिक्षणाच्या बालेकिल्ल्यांमध्ये आता दलित, बहुजन आणि आदिवासी विद्यार्थ्यांचा प्रवेश होणे हे आता एक वास्तव आहे. या विद्यार्थ्यांपैकी अनेकजण हे त्यांच्या कुटुंबातून विद्यापीठात जाणारे ते पहिलेच व्यक्ती आहेत. त्यांच्या ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित सामाजिक दर्जा आणि हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे, शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यक्षम सहभागी म्हणून वावरण्यासाठी आवश्यक असलेले 'सामाजिक भांडवल आणि व्यावसायिक नेटवर्क' बरेचदा त्यांच्याकडे नसते. प्रस्थापित पूर्वग्रहांनी घडलेले त्यांचे सामाजिक-उच्चभ्रू समवयस्क त्यांना समान मानण्यास अनेकदा कचरतात. हा बहिष्कार अनेक पातळ्यांवर कार्य करतो, ज्याची व्याप्ती दलित रूममेट टाळण्यासाठी विद्यार्थ्याने हॉस्टेलची खोली बदलण्यासारख्या 'सूक्ष्म आक्रमणांपासून' (Subtle aggressions) ते तोंडी परीक्षेत (Viva) प्राध्यापकांनी दलित, बहुजन आणि आदिवासी विद्यार्थ्याला किमान गुण देण्यापर्यंत, किंवा प्रवेश, प्राध्यापक भरती आणि प्रशासकीय पदांवरील राखीव कोट्याची जाणीवपूर्वक पूर्तता न करणे यांसारख्या संरचनात्मक अपयशांपर्यंत आहे. हा संघर्ष मानहानी, शारीरिक हिंसाचार आणि अत्यंत गंभीर प्रकरणांमध्ये, आत्महत्येचा मुखवटा घातलेल्या 'संस्थात्मक हत्यांच्या' (Institutional murders) स्वरूपात प्रकट होऊ शकतो.रोहित वेमुला आणि पायल तडवी यांच्या दुःखद मृत्यूनंतर, नागरी समाज गट आणि राजकीय संघटनांनी दलित, बहुजन आणि आदिवासी विद्यार्थ्यांचे हक्क, प्रतिष्ठा आणि करिअरचे संरक्षण करण्यासाठी एक ठोस संवैधानिक यंत्रणा तयार करण्याची मागणी सातत्याने केली आहे. याचे कारण असे की, उच्च शिक्षण संस्थांमध्ये अजूनही जाती-विभाजित संबंध आणि कॅम्पस जीवनावरील त्यांचे विषारी परिणाम हाताळण्यासाठी अंतर्गत यंत्रणेचा अभाव आहे. कारण उच्च शिक्षण संस्थांमध्ये वर्गीकरण केलेल्या जाती संबंधांचा आणि त्यांच्या कॅम्पस जीवनावर विषारी प्रभावाचा सामना करण्यासाठी अंतर्गत यंत्रणा अद्याप कमकुवत आहेत.संघर्षाचा मुद्दाया पार्श्वभूमीवर, विद्यापीठ अनुदान आयोगाचे प्रस्तावित 'समता नियमन विधेयक' जे २०१२ च्या फ्रेमवर्कवर आधारित आहे—हे ठोस न्यायाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि लोकशाही पाऊल असल्याचे दिसून आले. तथापि, या नियमांना काही सामाजिक उच्चभ्रू गटांकडून अधूनमधून विरोधाचा सामना करावा लागला आहे, त्यांचा असा युक्तिवाद आहे की, यामुळे जातीय दरी वाढेल आणि सामान्य प्रवर्गातील विद्यार्थ्यांविरुद्ध खोट्या तक्रारी दाखल करण्यासाठी याचा गैरवापर केला जाऊ शकतो. नियम ३(१)(क), जो जातीय भेदभावाची व्याख्या केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय सदस्यांविरुद्धचा भेदभाव अशी करतो, हा वादाचा मुख्य मुद्दा राहिला आहे. असा विरोध ही काही नवीन बाब नाही. १९९० मध्ये केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये आणि २००६ मध्ये उच्च शिक्षण संस्थांमधील प्रवेशांमध्ये ओबीसींचे आरक्षण वाढवण्याच्या राज्याच्या प्रयत्नांदरम्यानही अशाच प्रकारची भीती व्यक्त केली गेली होती. दोन्ही प्रसंगी, उच्च न्यायपालिकेने या तरतुदींचे संरक्षण केले आणि उपेक्षितांच्या सर्वसमावेशक कल्याणासाठी असे उपाय योजण्याच्या राज्याच्या भूमिकेला कायदेशीर मान्यता दिली. तथापि, सध्याच्या प्रकरणात, सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्य बागची यांच्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने यूजीसीच्या समता उपायांना "अस्पष्ट" आणि "अतिव्यापक" (Too sweeping) संबोधून स्थगिती दिली आहे. यात विसंगती अशी आहे की, याच सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी केंद्र सरकारला जातीय भेदभावाचा सामना करण्यासाठी 'अतिशय मजबूत आणि ठोस यंत्रणा' तयार करण्याचे निर्देश दिले होते. सुखदेव थोरात (२००७) आणि भालचंद्र मुंगेकर (२०१२) यांच्यासह अनेक अहवालांनी हे सिद्ध केले आहे की, एम्स (AIIMS), आयआयटी (IITs), आयआयएम (IIMs) आणि जेएनयू (JNU) सारख्या नामांकित संस्थांमध्ये बहिष्काराचे सूक्ष्म प्रकार अस्तित्वात आहेत, जे दलित, बहुजन आणि आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीवर मर्यादा आणतात.उच्चभ्रूंचा रोषया नियमांना विरोध करणाऱ्यांचा असा युक्तिवाद आहे की, अशा समस्या हाताळण्यासाठी अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ पुरेसा आहे. हा कायदा जरी एक प्रभावी साधन असला तरी, शैक्षणिक क्षेत्रातील दलित, बहुजन आणि आदिवासी सदस्यांना संस्थात्मक निष्काळजीपणा, पूर्वग्रह आधारित सामाजिक भेदभाव आणि इतर पक्षपातांचा नियमित सामना करावा लागतो, ते बारकावे हाताळण्यासाठी हा कायदा अपुरा आहे. शिवाय, ओबीसी विद्यार्थ्यांनाही भेदभावाच्या अशा सूक्ष्म आणि धोरणात्मक स्वरूपाचा सामना करावा लागतो जो ॲट्रॉसिटी कायद्याच्या कक्षेत येत नाही. या संस्थात्मक त्रुटी दूर करण्यासाठीच यूजीसीच्या समता नियमावलीचा प्रस्ताव मांडला गेला होता. मात्र, या सुधारणांना होणारा विरोध हा जातीय भेदभावाचे संरचनात्मक स्वरूप मान्य करण्याची किंवा अर्थपूर्ण सलोखा राखण्याची अनिच्छा दर्शवतो.सुधारणेच्या दिशेनेआरक्षण धोरणांनी विद्यापीठांमध्ये दलित, बहुजन आणि आदिवासी विद्यार्थ्यांचा प्रवेश सुलभ केला असला तरी, ते प्रस्थापित सामाजिक पूर्वग्रह नष्ट करू शकत नाहीत. संस्थांमध्ये दलित, बहुजन आणि आदिवासी सदस्यांचा सहभाग वाढवण्याच्या किंवा त्यांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करण्याच्या प्रयत्नांचे वर्णन नियमितपणे गुणवत्ता आणि 'राष्ट्रीय एकात्मता' यांच्यासाठी धोका म्हणून केले जाते. अशा मांडणीमुळे भेदभावाचे सामान्यीकरण होण्याचा आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीला कमी लेखण्याचा धोका निर्माण होतो. विद्यापीठे ही केवळ शिक्षणाची केंद्रे नसून सामाजिक परिवर्तनाची ठिकाणे आहेत. त्यामुळे, ठोस सामाजिक सर्वसमावेशकता सुनिश्चित करणे हे केवळ कायदेशीर कर्तव्य नसून एक नैतिक बंधन आहे. यूजीसीची नियमावली ही एक सुधारात्मक समन्वय आणि ठोस धोरणात्मक सुधारणा आहे, जी सामाजिक न्यायाच्या अजेंड्याप्रती सरकारची मोठी जबाबदारी दर्शवते. अशा संरक्षणात्मक उपायांशिवाय, शिक्षणाचा बालेकिल्ला मूठभर सामाजिक उच्चभ्रूंच्या जहागिरीखालीच (Fiefdom) राहील.

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा कालावधीत कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश

**बीड : (भगवंत पाळवदे, बीड जिल्हा प्रतिनिधी)** : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा आणि दि. २० फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. सदरील परीक्षा सुव्यवस्थीत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून परीक्षा केंद्राच्या परिसरात जमाबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असताना बाहेरच्या लोकांकडून उपद्रव होण्याची शक्यता असते. तसेच परिक्षा चालू असताना कॉपी पुरविण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेरॉक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दुरुपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता, परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचा-यानां बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये, तसेच जिल्हयात कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी जिल्हयातील फेब्रुवारी, मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा केंद्राचे १०० मिटर परिसरात परिक्षेचे साहित्य ठेवण्यात आलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी व अनाधिकृत कृत्य होऊ नयेत याकरिता खालील कृत्य करण्यास मनाई भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार आहे हे आदेश परिक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाही.परिक्षा केंद्राबाहेर व परिसरात परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी अणि परिक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. परिक्षा केंद्राचे १०० मी परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्र, फॅक्स केंद्र व ध्वनीक्षेपक ईत्यादी परीक्षा सुरु होण्याच्या एक तास अगोदर पासून ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय आणि परिक्षेसंबंधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहनाव्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध आहे सदर आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत.हे आदेश बीड जिल्हयाच्या हद्दीतील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा केंद्राचे १०० मीटर परिसरात व परीक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी दि.१० फेब्रुवारी २०२६ ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत त्या-त्या दिवशीच्या परिक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी लागू राहातील, असे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० फेब्रुवारी २०२६


## अपयशाने निराश न होता मिळालेल्या संधीचे सोने करा - डॉ. नंदकुमार राठी

### मुक्तविद्यापीठाच्या रोजगार मेळाव्याला उस्फूर्त प्रतिसाद ३५२ विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या, १०५ जणाना जागेवर नियुक्ती पत्र




**छत्रपती संभाजीनगर :** अपयश म्हणजे शेवट नाही तर अनुभवाची शिदोरी समजून झालेल्या चुकांची दुरुस्ती करुन यशाकडे झेपावण्याचा मार्ग आहे. म्हणून युवकांनी मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करावे असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्राचे संचालक डॉ. नंदकुमार राठी यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्र, सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय आणि युवाशक्ती फाऊंडेशनच्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्यात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. राठी बोलत होते. या रोजगार मेळाव्याचे उद्घाटन स. भु. महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष दिपकजी पांडे, यांनी केले. या प्रसंगी युवाशक्ती फाऊंडेशनचे डॉ. दिपक पवार, नांदेड विभागीय केंद्राचे संचालक डॉ. यशवंत कलेपवार, मुक्त विद्यापीठाच्या ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखेचे संचालक प्रा. कैलास मोरे, स. भु. शिक्षण संस्थेचे सदस्य डॉ. जगदीश खैरनार, प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे, प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. नंदकुमार राठी म्हणाले की, मुक्त विद्यापीठाचे शिक्षण हे केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता रोजगार क्षमतेकडे नेणारे असावे हा आमचा मुख्य उद्देश आहे. उद्योगजगताच्या गरजा ओळखून विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक कौशल्यांचा विकास करणे आणि त्यांना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांचे कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यवसाईक दृष्टीकोन विकसीत करण्याच्या दृष्टीने असे रोजगाराभिमुख उपक्रमे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमुद केले. युवाशक्ती फाऊंडेशनच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना जागतीक स्तरावरील कंपन्यांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याचे ही त्यांनी स्पष्ट केले.या रोजगार मेळाव्यास ३५२ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती दिल्या त्यातील १०५ लोकांना लगेचच नियुक्ती पत्र देण्यात आले. या प्रसंगी स. भु. महाविद्यालयाच्या प्रशासनाच्या वतीने विद्यापीठाच्या या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा रोजगरर व कौशल्यविकास केंद्रित उपक्रमाचे आयोजन करण्याची ग्वाही दिली. या रोजगार मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून त्यांच्या करिअरला निश्चित दिशा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. तृप्ती रेंगे यांनी केले.






## एकेकाळी नटांना नाच्या म्हणणारे आज एकत्र व्यासपीठावर; प्रकाश आंबेडकरांचा घणाघात

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेत सरसंघ चालक मोहन भागवत तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात अभिनेता सलमान खान उपस्थित होता. यावरून देखील आंबेडकरांनी संघावर टीकेची झोड उठवली आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, मोहन भागवत यांनी मुंबईत बॉलीवूडमधील लोकांसमोर भाषण दिले. आरएसएसने एकेकाळी ह्या सर्व सांस्कृतिक कलेचा निषेध केला होता, शिव्या दिल्या होत्या. नटांना नाच्या म्हणून त्यांनी संबोधले होते. सिनेमातील जे सेलिब्रिटी आहेत, त्यांना त्यांच्या कामामुळे समाजात मान्यता आहे, त्याचा फायदा घेण्यासाठी आरएसएसने हे काम सुरू केले आहे. हे आरएसएसचे नवीन चारित्र्य असल्याची टीका आंबेडकरांनी केली आहे. तसेच आरएसएसचे गोळवलकर यांनी बंच ऑफ थॉट्स या पुस्तकात आरएसएससाठी सांस्कृतिक रोड मॅप दिला होता, त्याचा मोहन भागवत निषेध करतायत का? याचा खुलासा त्यांनी करावा, असेही आंबेडकर म्हणाले.

विनायक दामोदर सावरकर यांना भारतरत्न देण्याची मागणी सध्या सुरू आहे. यावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, दुर्दैवाने मोहन भागवत यांनी सावरकर यांच्यावरचा माझा लेख त्यांनी वाचला नसेल. सावरकरांचे दोन चेहरे आहेत. एक क्रांतिकारी सावरकर आणि एक ब्रिटीशांना मदत करणारे सावरकर. जेलमध्ये जाण्याच्या आधी ते क्रांतिवीर होते, हे सर्वांनीच मान्य केले पाहिजे. पण जेलमधून बाहेर आल्यानंतर त्यांची संघटना जी होती हिंदू महासभा, या संघटनेने पत्री सरकारच्या लढवय्याना ब्रिटीशांना पकडून देण्याचे काम केले आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, महाराष्ट्रात महाराष्ट्रामध्ये ब्रिटिशांविरोधात पत्री सरकार लढत होते, तेव्हा त्या लढवय्यांना ब्रिटिशांना पकडून देण्याचे काम हिंदू महासभा करत होती. सातारा, सांगली, कोल्हापूरमधील पत्री सरकारमधील अनेकांना त्यांनी पकडून दिले होते. तेव्हा हिंदू महासभेच्या एका व्यक्तीने सांगितले होते की, हे काम आम्ही आमच्या प्रमुखाच्या म्हणजेच विनायक सावरकर यांच्या सांगण्यावरून करतोय. सावरकरांनी ब्रिटिशांना मदत केली होती. त्यामुळे अशा व्यक्तीला भारतरत्न द्यावा, असे मी मानत नाही, असे मत आंबेडकरांनी व्यक्त केले आहे.